# गोरगरिबांच्या पोटचा घास हिरावून घेणाऱ्या शिव भोजन चालकांना जिल्हाधिकाऱ्यांनी एकदा धडा शिकवायला हवं?


अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
**आरंभ**
संपादक : दिपक थोरात Mob.9860898564


## दररोज थाळीतला मेनु गायब, चालक झाला गोरगरिबांचा साहेब; अन्न व नागरी पुरवठा विभागाचे दुर्लक्ष?


■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष – ०२ ■ अंक – २६० ■ रविवार दि.८ जून २०२५ ■ आरएनआय – एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रू. । पाने ४

■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 260 ■ Sunday Dt.8 June 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4


## अन्न दिल्याने पुण्य मिळतं असं बोलले जाते

# मात्र हे अन्न देण्याऐवजी पाप करण्याचे काम करतायेत म्हणून शिवभोजन थाळी फक्त नावालाच उरली आहे का?

## गोरगरीब गरजवंतांवर उपासमारीची वेळ गोरगरिबांना म्हणतात चलपळ?

# गेवराई शहरात शिवभोजनचे तीनतेरा वाजले, चालक फक्त फोटो घेण्यासाठी गाजले?

गेवराई । प्रतिनिधी

कोरोना सारख्या महामारीच्या काळात अनेकांना दोन वेळेच्या जेवणाची सोय करणे देखील अवघड झाले होते. म्हणून अशा संकटकाळात गरजू नागरिकांना दोन वेळेचे जेवण उपलब्ध व्हावे यासाठी महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री उद्धवजी ठाकरे व त्यावेळेसचे अन्नपुरवठा मंत्री छगनरावजी भुजबळ साहेब यांच्या तात्कालीन महाविकास आघाडीच्या सरकारच्या कालावधीत शिवभजन थाळी उपलब्ध करून देण्यात आल्यामुळे मोठ्या प्रमाणावर मजूर वर्गाला या योजनेचा लाभ झाल्याचे दिसत होतं यावेळी शिवभोजन थाळी मोफत देण्यात येत असल्याचे सांगितले जाते. परंतु ज्यांच्या घरात चूल पेटत नाही, अशा निराधार, बेघर नागरिकांना रोजच्या जेवणाची सुविधा संपूर्ण महाराष्ट्रात उपलब्ध करून देण्यात आली असून गेवराई शहरातील विविध भागात थाळी नुसती नावाला चालू आहे की काय अशी चर्चा सुरू झाली आहे.



या योजनेद्वारे गरीब कष्टकऱ्यांना केवळ दहा रुपयात जेवण दिले जाते ही योजना महाराष्ट्र राज्यातील गरीब व कष्टकऱ्यांसाठी सुरू करण्यात आलेली आहे गोरगरिबांना अल्प दरात व सहज मिळणारे भोजन उपलब्ध होत आहे या योजनेअंतर्गत गेवराई उपजिल्हा रुग्णालय, नवीन बस स्टँड, शासकीय कार्यालय आदीगर्दीच्या ठिकाणी शिवभोजन थाळी केंद्रे सुरू करण्यात आली आहे हे केंद्र मिळवण्यासाठी काही निकष सरकारने ठरवून दिले आहेत हे नक्की काय आहेत शिवभोजन केंद्रात नागरिकांना कुठल्याही सुविधा दिल्या जात नाही नुसते फोटो काढायचे आणि अपलोड करायचे एका थाळी मागे पैसे मिळवायचे असा कारभार व प्रकार सध्या सुरू आहे तर काही ठिकाणी दररोज मेनू गायब केला जात आहे पूर्ण पदार्थ न देता ग्राहकांची फसवणूक केली जाते तुम्हाला दहा रुपयात अजून काय काय द्यायचं असा रुबाब देखील गाजवला जातो मात्र दररोज हातांवर पोट भरणारे लोक गपचूप निघून जातात तर काही ठिकाणी जेवणासाठी मिळणारे ताट देखील स्वच्छ धुतले जात नाहीत तर काही चालक या बसा आणि फोटो काढून देऊन फसा असा प्रताप करत आहेत थांबा ना प्लीज फोटो काढून द्या अशी विनवणी करत असताना पाहायला मिळाले सरकारने राबवलेल्या उत्कृष्ट भोजनाचा आस्वाद देण्याऐवजी स्वतःच्या स्वार्थापोटी चालकांनी त्या योजनेचा खेळ मांडला आहे. अन्न दिल्याने पुण्य मिळतं असं बोललं जात होतं मात्र हे अन्न देण्या ऐवजी पाप करण्याचे काम करत आहेत त्यामुळे म्हणून शिवभोजन थाळी नुसती नावाला उरली आहे का? नेमकं काय चाललंय अशा या होणांऱ्या कारभारामुळे जनतेच्या मनात पेज निर्माण झाला आहे. याकडे बीड जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन साहेब व जिल्हा अन्नपुरवठा विभागाने तात्काळ लक्ष घालून संबंधितावर कडक कारवाई करावी आणि गोरगरिबांना गरजवंतांना त्यांच्या हक्काचे भोजन मिळून द्यावे अशी मागणी जनतेतून होत आहे.




## रांजणगाव तिहेरी हत्याकांडाचे गूढ उलगडले

### मयत महिला माजलगावची; पोलिसांचा तपास यशस्वी

बीड । प्रतिनिधी

पुणे जिल्ह्यातील शिरूर तालुक्यातील रांजणगाव येथे २५ मे रोजी एका २५ वर्षीय महिला आणि तिच्या दोन लहान मुलांचे अर्धवट जळालेल्या अवस्थेतील मृतदेह आढळून आल्याने खळबळ उडाली होती. तपासात या महिलेची ओळख पटवण्यात पोलिसांना १० दिवस लागले. अखेर या तिहेरी हत्याकांडाचा उलगडा झाला असून मृत महिला बीड जिल्ह्यातील माजलगाव तालुक्यातील वाघोरे गावची असल्याचं निष्पन्न झालं आहे.

या घटनेत मृत महिलेसह तिच्या १ व २ वर्षांच्या चिमुकल्यांची निर्दय हत्या करण्यात आली होती. सुरुवातीला ही महिला या परिसरातील कोणालाही ओळखीची नव्हती. त्यामुळे तपास

▶ पान २ वर

## अपहरण झालेल्या इसमाची तेलगांव येथे सुटका

### तीन अपहरणकर्ते पोलीसांच्या ताब्यात

बीड । प्रतिनिधी

अपहरणानंतर, विविध घटनांमध्ये, बऱ्याच जणांची बीड पोलिसांनी सुखरूप सुटका केल्याचे बीड जिल्ह्याने पाहिले आहे. काही घटनांमध्ये, खंडणीसाठी अपहरण करण्यात आले, तर काही जणांचे पैशांच्या व्यवहारातून अपहरण करण्यात आले. असाच काहीसा प्रकार काल दुपारी तेलगाव येथे घडला. काल दुपारी २.१५ वा. स्थागुशा बीड येथिल पोउपनि श्रीराम खटावकर यांनी दिंदुड पोलीस स्टेशन



चे प्रभारी अधिकारी महादेव ढाकणे यांना माहिती दिली की, जवळा बाजार ता. औंढा नागनाथ येथुन एक इसमाचे अपहरण करण्यात

▶ पान २ वर

## लग्नाचे आमिष दाखवले, नवरदेवाच्या वडिलांकडून उकळले पैसे

बीड । प्रतिनिधी



महाराष्ट्रात अविवाहीत तरूणांची संख्या मोठी असून लग्नासाठी मुलगी मिळणे कठीण होवुन बसले आहे. याच संधीचा गैरफायदा उचलत तरूणांना लग्नाचे अमिष दाखवत लग्नाचा बनाव करून पैसे उकळले जातात. समाजात बदनामी होईल, म्हणून फसवणूक झालेला परिवार तक्रार करीत नाहीत. हा महाराष्ट्रातील एक ज्वलंत विषय बनला आहे. आष्टी शहरातील एका अविवाहीत तरूणाला अशाच प्रकारे लग्नाचा बनाव करून त्याच्या वडिलांकडून ५ लाख रूपये उकळणाऱ्या टोळीला आंभोरा पोलीस ठाण्यातील पथकाने गजाआड केले आहे.

यातील आरोपी क्र १) लक्ष्मण साहेवराव जगताप २) विष्णु मसु कुऱ्हाडे दोन्ही रा. कापसी ता. आष्टी जि.बीड ३) ज्योती पाटील रा. वाघोली पुणे यांनी मुलाच्या वडिलांकडून ५,७०,०००/– रुपये घेवुन मुलगा राम यास लग्नासाठी मुलगी दाखवली व आरोपी क्र ४) निकीता हिचे सोबत दि.१६.०३.२०२५ रोजी व आरोपी क्र ५) अश्विनी हिच्या सोबत दि.११.०५.२०२५ रोजी मुलाच्या वडिलांकडून पैसे घेवुन लग्न लावुन दिले. नंतर या दोन्ही मुली विश्वास घात करुन पळुन गेल्या. तसेच मुलाच्या वडिलांना आरोपी लक्ष्मण जगताप, विष्णु मसु कुऱ्हाडे यांनी लाथा बुक्यांनी मारहाण करुन शिवीगाळ करुन जिवे मारण्याच्या धमक्या दिल्या यावरून आरोपींवर गुरनं. २२०/२०२५ कलम ३१८ (२), (३), (४). ३५१(२), ३५२,३ (५) भा न्या. सं. नुसार आंभोरा पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

मुला–मुलींच्या आई–वडिलांनी समोरच्यांची खात्री करूनच लग्न लावले पाहिजे. अशा प्रकारे घाईगडबडीत लग्न लावून देणाऱ्यांपासून नागरिकांनी सावध राहायला हवे. असे काही एजंट असल्यास पोलिसांशी संपर्क करावा.

### गेवराई येथील कन्या उर्दू कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांच्या प्रश्नाकडे अमरसिंह पंडितांनी लक्ष घातले

## शाळा सुरू होण्यापूर्वी दोन शिक्षकांची पर्यायी व्यवस्था होणार

गेवराई । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील एकमेव असलेल्या जिल्हा परिषद कन्या उर्दू कनिष्ठ महाविद्यालयात शिकविण्यासाठी एकही शिक्षक नसल्याने विद्यार्थिनींचे शैक्षणिक नुकसान अटळ होते. परंतु शिक्षणप्रेमी असलेले राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस, माजी आमदार अमरसिंह पंडित यांनी आता याकडे लक्ष घातल्याने शाळा सुरू होण्यापूर्वीच या कनिष्ठ महाविद्यालयात दोन शिक्षकांची पर्यायी व्यवस्था होणार असून शिक्षकांची तीन रिक्त पदे भरून हा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लावला जाईल, असे अमरसिंह पंडित यांनी शिष्टमंडळाला सांगितले.



गेल्या २५ वर्षांपासून सुरू असलेल्या गेवराई येथील जिल्हा परिषद कन्या उर्दू कनिष्ठ महाविद्यालयात शिक्षकांची तीन पदे रिक्त असून केवळ एका पर्यायी शिक्षकावर हे महाविद्यालय चालत आहे. परंतु त्या

▶ पान २ वर

### गेवराई येथे सुसज्ज शादीखाना उभारणार!

गेवराई येथे शादीखाना उभारण्यासाठी माजी आमदार अमरसिंह पंडित यांनी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती मुजीब पठाण यांच्यासह पदाधिकाऱ्यांसोबत बीड येथील अनेक शादीखानाची पाहणी केली असून गेवराई शहरात कोठेही सुसज्ज शादीखाना नसल्यामुळे मुस्लिम बांधवांची फार गैरसोय होत असल्याने या ठिकाणी लवकरच सर्व सोयींनीयुक्त असा भव्य, दिव्य शादीखाना उभारण्यात येईल आणि गरीब असो की, श्रीमंत ? सर्वांसाठी हा शादीखाना विनाशुल्क आणि विनामूल्य असेल, असेही अमरसिंह पंडित यांनी यावेळी आवर्जून सांगितले. त्यांच्या या लोककल्याणकारी आणि धाडसी निर्णयाचे शिष्टमंडळातील सर्व उपस्थितांनी स्वागत केले.

दैनिक महाराष्ट्र आरंभच्या दणक्याने आली गेवराई नगरपालिकेच्या बांधकाम विभागाला जाग!

# सिदाजी आप्पा चौकातील खड्डा अखेर बुजवला

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई शहरातील सिदाजी आप्पा चौकात पाईपलाईन दुरुस्तीसाठी भला मोठा खड्डा खादला होता. पोलीस स्टेशन परिसरातील असलेल्या महात्मा फुले सिटी सेंटर येथे तळघरात पावसाळ्यामुळे पाणी साचत होते यासाठी ब्लॉक झालेली पाईपलाईन मोकळी करण्यासाठी पोलीस स्टेशन रोडला भला मोठा खड्डा करण्यात आला आहे. हा खड्डा अपघाताला निमंत्रण देण्यास ठरत आहे. याकडे गेवराई नगर परिषदेच्या बांधकाम विभागाचे दुर्लक्ष असल्याचे पाहायला मिळाले याबाबत दैनिक महाराष्ट्र आरंभ च्या अंकात दिनांक सात जून रोजी बातमी प्रकाशित केली होती.

याच बातमीची गेवराई नगर परिषदेच्या बांधकाम विभागाचे विभाग प्रमुख यांनी तात्काळ त्याच दिवशी दखल घेऊन अपघातास निमंत्रण करत असलेला खड्डा ताबडतोब बुजवला आहे. या खड्ड्यामुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होत होता आता या रस्त्याने मोकळा श्वास घेतला आहे.

शहरातील मुख्य वस्तीत असलेल्या या रस्त्यावर येणाऱ्या जाणाऱ्या वाहन चालकाला मोठी कसरत करावी लागत होती त्यामुळे जीव मुठीत धरून जावा लागत होतं गेवराई नगर परिषदेच्या वतीने आज दिनांक ८ जून रोजी सकाळपासूनच खड्डा बुजवण्याचे काम सुरू होतं हा खड्डा बुजवला खरा मात्र काम थातुर्मातुर करून संबंधित विभागप्रमुख निघून गेले. सदरील





सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ
मुख्य संपादक दीपक थोरात - मो.9860898564

सिदाजी आप्पा चौकात पाईपलाईन दुरुस्तीसाठी
खोदलेला खड्डा अपघाताला निमंत्रण
गेवराई नगर परिषदेच्या बांधकाम विभागाचे दुर्लक्ष?

07 Jun 2025 - Page 2 | epaper.maharashtraaarambh.com
Powered by softisky | 9764331134

आरंभ इफेक्ट

या बुजवलेला खड्डाला व्यवस्थित रोलर मार्फत दाब न दिल्यामुळे रस्ता सुरळीत झाला नाही. एखादा पाऊस आला तर त्या ठिकाणी परत चिखल होणार आणि हा परिसर चिखलाने माखल्याशिवाय राहणार नाही त्यामुळे संबंधित विभागाने पुन: एकदा रोलरच्या माध्यमातून रस्ता सुरळीत करून द्यावा अशी नागरिकांची मागणी आहे.

## नसीम इनामदार यांना न.प. अध्यक्षपदाची उमेदवारी द्यावी; नागरिकांची मागणी

बीड । प्रतिनिधी

आगामी बीड नगर परिषदेच्या निवडणुकीत अध्यक्षपदासाठीची उमेदवारी राष्ट्रवादी शरद पवार काँग्रेसकडून माजी उपाध्यक्ष हाजी नसीम इनामदार यांना देण्याची मागणी सर्वानुमते करण्यात आली. शहरातील बालेपीर भागातील वरिष्ठ नागरिक नवाब इनामदार यांच्या निवासस्थानी व वरिष्ठ समाजसेवी नाना थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या बैठकीत आगामी नगरपालिका अध्यक्षपदाच्या निवडणुकीसंदर्भात चर्चा झाली. यावेळी माजी उपाध्यक्ष हाजी नसीम इनामदार यांना राष्ट्रवादी शरद पवार काँग्रेसकडून अध्यक्षपदासाठी उमेदवारी देण्याची मागणी करण्यात आली. व तसे सर्वानुमते ठरविण्यात आले. यावेळी हाजी जुबेर, शफिक इनामदार, शोएब शेख, सय्यद अब्बास, सय्यद पापा भाई, शेख मोईन, काझी मुजीब यांच्यासह अनेक कार्यकर्ते आणि प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते.

हाजी नसीम इनामदार हे सर्व जाती- धर्माच्या लोकांना सोबत घेऊन चालणारे आणि विकासप्रेमी व्यक्तिमत्त्व म्हणून ओळखले जातात. २०११ ते २०१७ या काळात त्यांनी नगरसेवक म्हणून काम केले. यावेळी त्यांनी शहरातील बशीरगंज, एस.पी. ऑफिस रोड, सरकारी दवाखाना रोड, आसेफ नगर, थोरातवाडी येथील अनेक विकासकामे मंजूर करून पूर्ण केली. याशिवाय, किल्ला मैदान येथे जामा मस्जिदजवळ २५ लाख रुपये खर्चून हज हाऊसची भव्य इमारत बांधली. तसेच, छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगणाची जागा हस्तांतरित करून शहरवासीयांसाठी भव्य मैदान उपलब्ध करून दिले. बेसहारा आणि बेघरांसाठी नवीन भाजी मंडई येथे निवारा केंद्र कामही त्यांनी पूर्ण केले. राजुरीवेस ते बलभीम चौक, धोंडीपूरा आणि बलभीम चौक ते जुनाबाजार या रस्त्यांचे कामही त्यांच्या उपाध्यक्षपदाच्या काळात पूर्ण झाले.

सामाजिक कार्यातही नसीम इनामदार यांचा मोलाचा वाटा आहे. लोकसभा निवडणुकीत त्यांनी अजीत पवार गटात असताना बजरंग सोनवणे यांना निवडून आणण्यासाठी समाजाला एकत्रित केले. तसेच, विधानसभा निवडणुकीत सय्यद सलीम यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी शरद पवार गटात प्रवेश करून संदीप क्षीरसागर यांच्या विजयाचा मार्ग सोपा केला. यामुळे ते विधानसभेचे 'गेम चेंजर' ठरले.

बीडवासीयांचे मत आहे की, सय्यद सलीम आणि संदीप क्षीरसागर यांनी पक्षश्रेष्ठींसमवेत नसीम इनामदार यांना उमेदवारी देऊन त्यांच्या विकासकामांना आणि सामाजिक योगदानाला संधी द्यावी. हाजी जुबेर यांनी पत्रकातून ही मागणी पक्षश्रेष्ठींपर्यंत पोहोचवली आहे.

## संत ज्ञानेश्वर माऊली महाराज चाकरवाडीकर रौप्यमहोत्सवी पुण्यस्मरण सोहळा

### बाजीराव धर्माधिकारी यांना माऊली सेवा समर्पण पुरस्कार जाहीर

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

अखिल भारतीय वारकरी मंडळ यांच्या वतीने २१ व्या शतकातील महान संत ज्ञानेश्वर माऊली महाराज चाकरवाडीकर यांच्या रौप्यमहोत्सवी पुण्यस्मरणानिमित्त परळीचे माजी नगराध्यक्ष बाजीराव भैय्या धर्माधिकारी यांना माऊलीसेवा समर्पण पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

सामाजिक, धार्मिक आणि सांस्कृतिक क्षेत्रातील त्यांचे दीर्घकालीन योगदान, निस्वार्थी सेवा आणि समर्पण वृत्ती याची दखल घेत अ.भा. वारकरी मंडळाने यावर्षीच्या पुरस्कारासाठी त्यांची निवड केली असल्याचे अ.भा. वारकरी मंडळाचे प्रदेशाध्यक्ष ह.भ.प. रामेश्वर महाराज कोकाटे यांनी सांगितले आहे. श्री. धर्माधिकारी यांचे कार्य समाजासाठी एक दीपस्तंभ ठरलेले आहे. त्यांनी दाखवलेला सेवाभाव आणि सातत्यपूर्ण प्रयत्न प्रेरणादायी आहेत. हा पुरस्कार संत सेवा, समाजकार्य आणि भक्तिपंथातील सेवा,समर्पण व योगदानासाठी दिला जात असुन, यंदा पुरस्काराचे रौप्यमहोत्सवी वर्ष असल्याने त्याचे महत्त्व अधिकच आहे. पुरस्कार वितरणाचा सोहळा लवकरच परळी येथे होणार असून, मान्यवरांच्या उपस्थितीत हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.

यामध्ये संतविचार, वारकरी संप्रदाय, आणि समाजसेवेचे महत्त्व अधोरेखित करणाऱ्या व्यक्तीमत्वाचा गौरव होणार आहे. श्री. बाजीराव भैय्या धर्माधिकारी यांच्या निवडीचे सर्वत्र स्वागत होत असुन, विविध संस्था, संघटना आणि नागरिकांकडून त्यांना अभिनंदनाचा वर्षाव केला जात आहे.

## जालिंदर सुपेकर यांच्या कारागृह महानिरीक्षक पदाच्या कार्यकाळातील अनेक बदल्या संशयाच्या भोवऱ्यात!

पुणे । प्रतिनिधी

वैष्णवी हगवणे आत्महत्या प्रकरणामुळे चर्चेत आलेले वरिष्ठ पोलीस अधिकारी जालिंदर सुपेकर यांच्या काळ्या कारनाम्यांचे किस्से आता बाहेर येत आहेत. अशातच आता जालिंदर सुपेकर यांच्या कारागृह महानिरीक्षक पदाच्या कार्यकाळातील अनेक बदल्या संशयाच्या भोवऱ्यात सापडल्या आहे. सोबतच या बदल्यांमध्ये मोठ्या प्रमाणात आर्थिक गैरव्यवहार झाल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. आधी तुरुंग अधिकारी, वरिष्ठ तुरुंगाधिकारी, वरिष्ठ लिपिक कार्यालयीन अधीक्षक आणि तांत्रिक कर्मचारी या पदांवरील बदल्यांचे अधिकार विभागीय कारागृह उपमहानिरीक्षकांना होते. मात्र सुपेकरांनी विभागीय उपमहानिरिक्षकांचे हे अधिकार काढत ते स्वत:कडे घेतले. त्यानंतर २०२३ या एकाच वर्षात १४ वेळा विविध बदल्यांचे आदेश निघाले असल्याचे बोललं जात आहे. दरम्यान, सुपेकर यांच्या कार्यकाळात एकूण जवळपास ४५० बदल्या झाल्याची माहिती समोर आली आहे. या बदल्यांमध्ये तुरुंग अधिकारी, वरिष्ठ तुरुंगाधिकारी, वरिष्ठ लिपिक कार्यालयीन अधीक्षक आणि तांत्रिक कर्मचारी या पदांवरील कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. यातील २०५ बदल्यांमध्ये संशयास्पद आर्थिक देवाण-घेवाण झाल्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. यासाठी सुपेकर एकाच विभागात कार्यरत राहण्याची आधीची १० वर्षांची मुदत घटवत ती ६ वर्षांवर आणली असल्याचे ही बोललं जात आहे. या कार्यरत काळाची मुदत घटवल्यामुळे मोठ्या प्रमाणात बदल्यांचे व्यवहार झाला असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.

**भाजप आमदार सुरेश धस यांनीही केले होते गंभीर आरोप**

काही दिवसापूर्वी भाजप आमदार सुरेश धस यांनी ही जालिंदर सुपेकर यांच्यावर गंभीर आरोप केले होते. जालिंदर सुपेकर यांनी तुरुंगातील कैद्यांकडून ३०० कोटी रुपये मागितल्याचा आरोप त्यांनी केला होता. यानंतर दुसऱ्याच दिवशी पुण्यातील एका सावकाराच्या वकिलांनी जालिंदर सुपेकर यांच्यावर गंभीर आरोप केलेत. जालिंदर सुपेकर हे विशेष महानिरीक्षक (कारागृह) या पदावर कार्यरत होते. या काळात त्यांनी अमरावती येथील कारागृहात असणाऱ्या नानासाहेब गायकवाड आणि त्यांचा मुलगा गणेश गायकवाड यांच्याकडून जामीन मिळवून देण्याच्या मोबदल्यात ५५० कोटी रुपये मागितल्याचा आरोप ॲडव्होकेट निवृत्ती कराड यांनी केला आहे. यासंदर्भात आपण नागपूर खंडपीठात याचिका दाखल केल्याचेही त्यांनी 'एबीपी माझा'शी बोलताना सांगितले.

**जालिंदर सुपेकरांची बदली, डिमोशनही झालं**

वैष्णवी हगवणे आत्महत्या प्रकरणाशी संबंध आढळून आल्यानंतर गृह विभागाने जालिंदर सुपेकर यांच्यावर कारवाई केली होती. जालिंदर सुपेकर हे सध्या विशेष पोलीस महानिरिक्षक कारागृह व सुधार सेवा या पदावर कार्यरत होते. आता तिथुन त्यांची बदली पदावनती करुन उप महासमादेशक होमगार्ड या पदावर पाठवण्यात आले होते.

## बेकायदेशीर रजिस्ट्री, जिल्हाधिकारी कर्डिलेंचा दणका

नांदेड । प्रतिनिधी

राज्यातील प्रत्येक तालुक्यात आणि जिल्ह्यात जागेची खरेदी-विक्री करण्यासाठी निबंधक कार्यालयात नागरिकांची मोठी गर्दी असते. जागेची खरेदी विक्री हा मोठा आणि तितकाच गंभीर विषय असल्याने या विभागावर पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते व वरिष्ठ अधिकाऱ्यांची देखील करडी नजर असते. मात्र, तरीही या विभागात सातत्याने गैरप्रकार होत असल्याचं अनेकदा पाहायला मिळते. येथील कार्यालयात एजंटगिरी फोफोवल्याचं दिसून येतं, तर या एजंटगिरीला निबंधक महोदयांचेच पाठबळ असल्याचही समोर आलं आहे. आता, नांदेड जिल्ह्याच्या हदगाव येथील निबंधकांनी गैरमार्गाचा वापर करुन तब्बल १९० पेक्षा जास्त कागदपत्रांची नोंदणी चुकीच्या व गैरप्रकाराने केल्याचं समोर आलं. त्यानंतर, नांदेडच्या जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी दणका देत निबंधकांचे तत्काळ निलंबन केले आहे. आपल्या प्रामाणिक अन् तत्पर कामकाजाबद्दल कर्डिले यांचा प्रशासनात वेगळाच दबदबा आहे.

राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी जिल्हा अंतर्गत कोणत्याही तालुका रजिस्ट्री कार्यालयात कोणत्याही तालुक्याची खरेदी-विक्री रजिस्ट्री करण्याची मुभा दिली आहे. शासनाच्या याच योजनेचा गैरफायदा घेऊन नांदेड जिल्ह्यातील हदगाव तालुक्यात महिन्याभरात तब्बल १२०० रजिस्ट्री नोंदणी करण्यात आल्या. यातील ९०% रजिस्ट्री हदगाव तालुक्याच्या बाहेरील आहेत. या रजिस्ट्री करताना कोणत्याही नियमाचे पालन केले जात नसल्याचे तपासात उघड झाले. याबाबतच्या तक्रारी प्राप्त झाल्यानंतर जिल्हाधिकारी आणि जिल्हा निबंधक यांच्या अहवालावरून हदगाव दुय्यम निबंधक सेवलीकर यांना तात्काळ निलंबित करण्यात आले आहे.

हदगाव दुय्यम निबंधक संदर्भात सातत्याने तक्रारी करण्यात येत होत्या. त्यानंतर, मी सहनिबंधक यांच्या नेतृत्वात एका पथकाने ४०० पेक्षा जास्त कागदपत्रांची तपासणी केली. त्यामध्ये, १९० पेक्षा जास्त कागदपत्रांमध्ये गैरप्रकार, व्यवहार झाल्याचं समोर आल्याने तेथील निबंधकांवर कारवाई करण्यात आली आहे. निबंधक सेवलीकर यांनी अनेक रजिस्ट्री गैरप्रकार करून केल्याचे तपासात उघड झाल्यानंतर त्यांच्यावर तत्काळ कारवाई करण्यात आल्याचे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी सांगितले.

राहुल कर्डिले हे कर्तव्यदक्ष व सर्वसामान्यांसाठी तळमळीने काम करणारे अधिकारी असून गैरप्रकार खपवून घेत नसल्याने त्यांची प्रशासनात वेगळी ओळख आहे. विशेष म्हणजे यापूर्वी केवळ महिनाभरात तीन वेळा त्यांची बदली झाली होती. राहुल कर्डिले हे मूळचे अहिल्यानगर जिल्ह्यातील ठाणगावचे. त्याच ठिकाणी त्यांचे प्राथमिक शिक्षण झालं. तर पार्थडीमधील करंजी या गावात त्यांचे माध्यमिक शिक्षण झालं. अहिल्यानगरच्या विखे महाविद्यालयात त्यांनी इंजिनिअरिंगची पदवी घेतली. त्यानंतर त्यांनी स्पर्धा परीक्षेची तयारी सुरू केली. राहुल कर्डिले यांची महाराष्ट्र लोकसेवा आयोगातून उपनिबंधक म्हणून निवड झाली. त्या दरम्यान त्यांनी यूपीएससीच्या तीन मुलाखती दिल्या होत्या. पण त्यामध्ये अपयश आलं. मात्र, चौथ्या प्रयत्नात ते देशात ४२२ वा क्रमांक मिळवून उत्तीर्ण झाले आणि महाराष्ट्रमध्ये त्यांना काम करण्याची संधी मिळाली. राहुल कर्डिले यांच्या पत्नी प्रियंका कर्डिले यादेखील उपजिल्हाधिकारी म्हणून सेवा बजावत आहेत.

## दादा-ताई आषाढीपर्यंत एकत्र येतील : मिटकरी

पुणे । प्रतिनिधी

आगामी महापालिका निवडणुकांच्या अनुषंगाने राज्यात ठाकरे बंधुंच्या एकत्र येण्याची जोरदार चर्चा सुरू असून दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्याची चर्चा जरा मागे पडली आहे. मात्र, राष्ट्रवादीचे आमदार अमोल मिटकरी यांनी वक्तव्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस आणि उद्धव ठाकरे-राज ठाकरे एकत्र येण्यावर राष्ट्रवादीचे मिटकरी यांनी मोठं वक्तव्य केलं आहे. पांडुरंगाची ईच्छा असेल तर बहीण-भाऊ आषाढी एकादशीपर्यंतही एकत्र येऊ शकतात, असा गौप्यस्फोटच मिटकरी यांनी केला आहे. १० तारखेला पक्षाच्या मेळाव्यापर्यंत वाट बघा, मेळाव्यात मोठे संकेत मिळण्याचे सुतोवाच मिटकरींनी केले आहेत. आता मिटकरी यांच्या वक्तव्यावर आणि दोन राष्ट्रवादी एकत्र येण्यावर खासदार सुप्रिया सुळे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. हा काय माझा निर्णय नाही, कोण कुठे जाणार आहे? हा पक्षाचा निर्णय आहे. पवार साहेबांचे राजकारण आपल्याला सगळ्यांना माहीत आहे. पवारसाहेब जो निर्णय घेत आहेत, तो लोकशाही मार्गाने घेत असतात. यासंदर्भात मी सगळ्यांशी चर्चा करेल, कार्यकर्त्यांच्या मनात काय आहे ते मला कळेल अशी प्रतिक्रिया सुप्रिया सुळे यांनी दिली. तसेच, आमदार अमोल मिटकरींच्या वक्तव्यावरही सुप्रिया सुळेंनी भूमिका स्पष्ट केली. अजित पवार आणि मी लहानपणापासून बहीण-भाऊ आहोत, मिटकरी यांची जी इच्छा आहे, त्याबद्दल मी आभारी आहे, असे सुप्रिया सुळे यांनी म्हटले.

अंतिम निर्णय अजित दादा घेतील - मिटकरी सुप्रिया सुळेंच्या वक्तव्यावर आता अमोल मिटकरींनी देखील प्रतिक्रिया दिली आहे. ''सुप्रियाताईंनी आभार मानायचं काम नाही, कारण त्या खूप मोठया आहेत. दादा आणि ताईचं बहीण-भावाच नातं जन्मापासून आहे. दोन्ही पक्ष एकत्र असलं पाहिजे प्रत्येकाला वाटतं, तशी भावना आहेत. मात्र, अंतिम निर्णय अजितदादा घेतील, त्यांचा निर्णय आमच्यासाठी सर्वोच्च आहे, असे मिटकरी यांनी म्हटले.

## अंबाजोगाई नगरपरिषदेने राबविला 'एक पेड माँ के नाम' हा उपक्रम

## जागतिक पर्यावरण दिनी केले ४० रोपांचे वृक्षारोपण

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई नगरपरिषदेने 'एक पेड माँ के नाम' या उपक्रमातून जागतिक पर्यावरण दिनी सर्व्हे नंबर-१७ मध्ये विविध प्रजातींच्या ४० रोपांचे वृक्षारोपण केले. वर्षभर 'एक पेड माँ के नाम' उपक्रम राबविण्यात येणार आहे. या माध्यमातून वृक्ष संवर्धनास चालना मिळणार असून व वृक्ष संगोपन ही करण्यात येणार आहे. येथील नगरपरिषद अंबाजोगाई (जि.बीड) यांच्या मार्फत गुरूवार, दिनांक ५ जुन २०२५ रोजी जागतिक पर्यावरण दिनानिमित्त अमृत व दीनदयाळ अंत्योदय योजना, राष्ट्रीय नगरी उपजीविका अभियान (डीएवाय - एनयुएलएम) कृतीसंगम उपक्रमांतर्गत सर्वे नंबर-१७ या ठिकाणी 'एक पेड माँ के नाम' हा उपक्रम राबविण्यात आला.

या माध्यमातून वृक्षारोपण करण्यात आले. या प्रसंगी अंबाजोगाई नगरपरिषदचे, कार्यालयीन अधिक्षक शेख इफ्तेखार, सय्यद अन्वर, शहर अभियान व्यवस्थापक दिलीप तांबारे, शहर समन्वयक शेख समीरोद्दीन, नगररचनाकार ज्ञानेश्वर पोटे, शहर अभियंता किशोर मुंडे, धनंजय चव्हाण, लखन ओहाळ, स्वच्छता विभागाचे राजकुमार जोगदंड, सुपरवाझयर मल्हारी जोगदंड व इतर कर्मचारी तसेच शहरस्तर संघाच्या अध्यक्षा श्रीमती रोहिणी कडेकर, सिआरपी निर्गुण हावळे, सीमा खतीब, मनीषा वाघमारे, तसेच आनंदी, आदिशक्ती, आईसाहेब, प्रगती इत्यादी स्वयंसहायता महिला बचत गटांतील सदस्यांनी उत्स्फूर्तपणे वृक्षारोपण केले.

या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी स्वच्छता विभागाचे कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. शहरातील विविध प्रभागांमध्ये तसेच शाळा, महाविद्यालय, शासकीय कार्यालयातील परिसरामध्ये वृक्षारोपण करण्याची परवानगी दिल्यास 'एक पेड माँ के नाम' हा उपक्रम मोठ्या प्रमाणात राबविण्यात येणार आहे.



सदरील वृक्षारोपण केलेल्या वृक्ष रोपांचे एक वर्ष कालावधीसाठी संगोपन करण्याची जबाबदारी देखील स्विकारणार आहेत.

अंबाजोगाई नगरपरिषदेने 'एक पेड माँ के नाम' या उपक्रमातून जागतिक पर्यावरण दिनी सर्व्हे नंबर-१७ मध्ये विविध प्रजातींच्या ४० रोपांचे वृक्षारोपण केले. लागवड केलेल्या पर्यावरणपूरक लिंब, आपटा, चिंच, पिंपळ, करंज, वड इत्यादींचा समावेश आहे. याबाबत आमच्या प्रतिनिधीशी बोलताना शहर अभियान व्यवस्थापक दिलीप तांबारे यांनी सांगितले आहे की, अंबाजोगाई नगरपरिषदेने सन्माननीय मुख्याधिकारी प्रियांका टोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली व सुचनेनुसार 'एक पेड माँ के नाम' हे अभियान सुरू केले आहे.

ज्याचा उद्देश पर्यावरण संवर्धनासाठी समाजात जागरूकता पसरवणे आणि मातांबद्दल आदर व्यक्त करणे आहे. या मोहिमेअंतर्गत, आईच्या नांवाने एक झाड लावले जाते, जे पर्यावरणाचे रक्षण करते आणि चिरस्थायी स्मृती निर्माण करते. या मोहिमेचा उद्देश : पर्यावरण संवर्धन व्हावे, झाडे लावून, पर्यावरणाचे रक्षण करणे आणि निरोगी भविष्य निर्माण करणे हे या अभियानाचे खरे उद्दिष्ट आहे. आईंचा आदर : आपल्या आईच्या नांवाने झाडे लावून, मानवी जीवनाचे पालनपोषण करणाऱ्या मातांबद्दल आदर व्यक्त केला जातो. या अभियानात समुदाय सहभाग महत्त्वाचा आहे. स्थानिक समुदाय आणि विविध भागधारकांना सहभागी करून मोठ्या प्रमाणात सहभाग वाढविणे हे या मोहिमेचे खरे उद्दिष्ट आहे. हे अभियान मातांचे योगदान आणि महत्त्व अधोरेखित करते.

हे अभियान देशाच्या शाश्वत विकासाच्या शोधाशी सुसंगत आहे, जी पर्यावरण आणि सामाजिक विकासामध्ये संतुलन स्थापित करते. या अभियानाअंतर्गत विविध प्रकारची झाडे लावली जातात, ज्यामुळे हिरवळ वाढते. या अभियानाद्वारे, लोकांना पर्यावरण संरक्षणाबद्दल शिक्षित केले जाते आणि झाडे लावण्यास प्रोत्साहित केले जाते. सदरील अभियानाच्या यशस्वितेसाठी मुख्याधिकारी प्रियांका टोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली अंबाजोगाई नगरपरिषदेचे सर्व अधिकारी, विभागप्रमुख, कर्मचारी वर्ग, स्वच्छता विभागाचे कामगार बंधू-भगिनी आणि शहरातील विविध महिला बचत गट यांनी पुढाकार घेतला आहे. अशी माहिती शहर अभियान व्यवस्थापक दिलीप तांबारे यांनी दिली आहे.

पान १ वरून...

### रांजणगाव तिहेरी हत्याकांडाचे गूढ उलगडले

गुंतागुंतीचा ठरला. परंतु, पोलीस अधीक्षक संदीपसिंह गिल्ल यांच्या मार्गदर्शनाखाली ६ विशेष तपास पथकांची नेमणूक करण्यात आली होती. राज्यातील ३३ पोलिस ठाण्यांचे सहकार्य, १६,५०० भाडेकरूंची चौकशी आणि २५० सीसीटीव्ही फुटेजचे विश्लेषण यामुळे आरोपी गजाआड गेला.

तपासादरम्यान, बीड जिल्ह्यातील माजलगाव येथून स्वाती केशव सोनवणे ही महिला आणि तिचे दोन मुलगे स्वराज (२) व विराज (१) बेपत्ता असल्याचे निष्पन्न झाले. तिचा पती केशव सोनवणे याच्याकडे चौकशी केली असता, त्याने पत्नी वादावादीमुळे वेगळी राहत असल्याचं सांगितलं.

तपास अधिक खोलवर जात असताना समोर आलं की स्वातीचे तिच्या पतीसोबत वाद होते आणि तिचे गोरख बोखारे नावाच्या व्यक्तीसोबत अनैतिक संबंध होते. सतत लग्नासाठी तगादा लावल्यामुळे गोरखने तिला आणि तिच्या दोन चिमुकल्यांना फसवून रांजणगावला नेलं आणि स्वातीची तिच्याच ओढणीने गळा दाबून हत्या केली. त्यानंतर तिच्या दोन्ही मुलांनाही ठार केलं. पुणे ग्रामीण पोलिसांनी १० दिवसांच्या अथक तपासानंतर आरोपी गोरख बोखारेला अटक केली आहे.

### अपहरण झालेल्या इसमाची तेलगांव येथे सुटका

आले असुन त्यास काही इसमानी ऐींळसर कार क्रमांक चक४४ -ए ११९१ मध्ये टाकुन घेउन गेले त्यानंतर त्यांचे लोकेशन पात्रुड ता. माजलगाव येथे मिळाले, त्यावेळी सोपनि ढाकणे यांनी तात्काळ पो. स्टे. दिंद्रुड येथिल पोशि २१७५ साळुंखे, पोशि ३६० गायकवाड, चापोशि १६७० बनसोडे यांना तेलगाव येथे पाठवून नमुद वर्णनाच्या कारचा शोध घेण्याचे सांगीतले.

पोलीस पथकाने दुपारी ३.१५ सुमारास तेलगाव येथे स्थानिक नागरीकांच्या मदतीने कार थांबवून अपहरण झालेला इसम बळिराम लिंबाजी सांवत तसेच अपहरण करणारे इसम १) नामदेव माणिक घोळवे रा. अंबेवडगाव ता. धारूर, २) श्रीमती नागराबाई सुदाम तोंडे रा. धार रोड, परभणी ह.मु. जवळा बाजार ता. औंढानागनाथ जि. हिंगोली ३) बाबुराव गोविंदराव बड़े रा. कसारी ता.धारुर यांना त्यांचे कडील वाहन क्र. चक४४ -ए ११९१ सह ताब्यात घेवुन पो.स्टे. दिंदुड येथे आणले. चौकशीनंतर समजले की पैशाच्या व्यवहारातून यातील आरोपी श्रीमती नागराबाई सुदाम तोंडे रा. धार रोड, परामणी ह.मु. जवळा बाजार ता. औंढानागनाथ जि. हिंगोली हीने तीच्या साथीदारांच्या मदतीने बळिराम लिंबाजी सावंत याचे अपहरण केले होते. अपहरण झालेल्या व्यक्ती वर अपहरणकर्त्यांनी मारहाण केल्याने त्रास होतोय असे सांगितल्यावर त्याच्यावर सरकारी दवाखाना येथे औषधोपचार करण्यात आले.

आरोपी व पिडीत इसम यांची माहिती पोउपनि महादेव जिवारे पो. स्टे. औंढा नागनाथ जि. हिंगोली यांना देण्यात आली. औंढा नागनाथ येथील तपास पथक दिंद्रुड येथे आल्यानंतर पिडीत व्यक्ती, आरोपी व गुन्ह्यामध्ये वापरलेली कार त्यांच्या ताब्यात देण्यात आली. सदरील कारवाई पोलीस अधीक्षक श्री नवनीत कॉवत, अपर पोलीस अधीक्षक श्रीमती चेतना तिडके यांचे मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक महादेव ढाकणे, पोलीस उपनिरीक्षक श्रीराम खटावकर, पोशि २१७५ साळुंखे, पोशि ३६० गायकवाड, चापोशि १६७० बनसोडे यांनी केली आहे.

### शाळा सुरू होण्यापूर्वी दोन शिक्षकांची पर्यायी व्यवस्था होणार

शिक्षकाचीही इतर ठिकाणी प्रतिनियुक्ती करण्यात आल्याने शिक्षकांअभावी विद्यार्थिनींचे शैक्षणिक नुकसान होत असल्याने ज्येष्ठ पत्रकार काझी अमान आणि ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते सय्यद अब्दुल खुद्दुस यांनी हा प्रश्न मार्गी लावण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस तथा माजी आमदार अमरसिंह पंडित यांच्याकडे सतत पाठपुरावा केला होता. गुरुवार, दिनांक ५ जून २०२५ रोजी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते एस.वाय.अन्सारी, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती मुजीब पठाण, भवानी बँकेचे उपाध्यक्ष मुहम्मद अब्दुल हन्नान, प्रसिद्ध व्यापारी सय्यद अखिल, माजी नगरसेवक मुहम्मद आवेज शरीफ, भवानी बँकेचे संचालक सय्यद अब्दुल हसीब, राष्ट्रवादी अल्पसंख्यांकचे जिल्हा उपाध्यक्ष सरवरखान पठाण, पत्रकार काझी अमान, सय्यद अब्दुल खुद्दुस, शहराध्यक्ष नवीद मशायक, सय्यद एजाज अत्तार, जेके बाबूभाई, बिलाल राज, हारुन पटेल, अतीख चौधरी या मुस्लिम समाजाच्या शिष्टमंडळाने कृष्णाईवर अमरसिंह पंडित यांची भेट घेऊन याबाबत त्यांच्याशी सविस्तर चर्चा केली.

यावेळी अमरसिंह पंडित यांनी तात्काळ बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जीवने यांच्याशी भ्रमणध्वनीवरून संपर्क साधून उर्दू कनिष्ठ महाविद्यालयात दोन शिक्षकांची पर्यायी व्यवस्था करण्याचे सुचवले. त्यानुसार शाळा सुरू होण्यापूर्वीच त्या ठिकाणी दोन शिक्षकांची पर्यायी व्यवस्था करण्यात येईल, असे मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी सांगितले.

# परळी औष्णिक वीज केंद्राला ब्लॉक डायमंड आणि विश्वकर्मा सन्मान

परळी वैजनाथ | प्रतिनिधी

परळी औष्णिक वीज केंद्राच्या कोळसा हाताळणी विभागाला वर्षे २०२३ २४ आणि २०२४ २५ या कालावधीतील उत्कृष्ट कामगिरीसाठी ब्लॅक डायमंड पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. ६ जून २०२५ रोजी मुंबई येथे महावितरणच्या विसाव्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमाच्या हा प्रतिष्ठेचा पुरस्कार प्रदान करण्यात आला. महाजनको कंपनीचे अध्यक्षीक व व्यवस्थापकीय संचालक राधाकृष्णन बी. यांच्या हास्ते प्रभारी अध्यक्षीक अभियंता सुरेश गरजे यांनी हा पुरस्कार स्वीकारला.



याच कार्यक्रमात कोळसा हाताळणी विभागातील दोन तंत्रज्ञाना विक्रम पाठक (संच क्रमांक ६.७.८) आणि सचिन कानडे (यांत्रिकी देखभाल) त्याच्या उत्कृष्ट वैयक्तिक योगदानाबद्दल विश्वकर्मा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. विक्रम पाठक यांनी वाहान दुरुस्ती विभागात विशेष खापरखेडा विद्युत केंद्रातील कठीण प्रसंगांमध्ये केलेल्या कामातून आपली कार्यक्षम प्रसिद्ध केली आहे तर सचिन कानडे यांत्रिकी देखभाल विभागात त्यांचा उत्कृष्ट आणि नविन्यपूर्ण कामासाठी ओळखले जातात. परळी औष्णिक वीज केंद्राची ही कामगिरी महानिर्मितीच्या १००० मेगावॉटपेक्षा कमी कमी क्षमता असलेल्या विभागामध्ये सर्वोत्कृष्ट ठरली आहे. संच क्रमांक ६७ ८ कोळसा हाताळणी विभागाने उत्कृष्ट तांत्रिक कौशल्य आणि उपलब्ध संसाधनाचा योग्य वापर करत हे यश संपादन केले.

या महत्वपूर्ण यशामागे परळी औष्णिक वीज केंद्राचे मुख्य सुनील इंगोले प्रभारी उप अभियंता हिम्मतराव अवचार आणि प्रभारी अध्यक्षीक अभियंता सुरेश गरजे यांचे वेळोवेळी मिळालेले सहकार्य आणि मार्गदर्शन महत्त्वाचे ठरले. कोळसा हाताळणी विभागातील अतिरिक्त कार्यकारी अभियंता शाहूराज येवते व गजानन आरोळे, उपकार्यकारी अभियंता गणेश बांगर, इब्राहम मणियार, चंद्रकांत कोहळे, धनंजय हट्टी तसेच सर्व सहाय्यक आणि कनिष्ठ अभियंता (सुव्यवस्था व संचलन) सर्व कर्मचारी आणि सर्व कंट्रादार याच्या आतक मेहनतीमुळेच हे यस प्राप्त झाली आहे. या गौरव सोहळयाला कंपनीचे संचालक संजय मारुडकर, प्रभारी संचालक (प्रकल्प) अभय हरणे, प्रभारी संचालक (खणीकर्म) राजेश पाटील आणि संचालक विश्वास पाठक यांची प्रमुख उपस्थिती होती.

# पत्रकार अनिल गलांडे यांच्या श्री संस्कार इंग्लिश स्कूलचा नवीन इमारतीचा उद्घाटन सोहळा संपन्न



केज | प्रतिनिधी

ज्येष्ठ पत्रकार अनिल गलांडे यांचे श्री संस्कार इंग्लिश स्कूलचा नवीन इमारतीचा उद्घाटन समारंभ शनिवार दि.०७ जून २०२५ रोजी चिंचोली माळी ता.केज जि.बीड येथे संपन्न झाला. या कार्यक्रम प्रसंगी अनिल वैरागे आणि स्नेहल ताई यांनी गीतांची महफिल सजवत आलेल्या पाहुण्यांचे मनोरंजन केले. यावेळी या कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून बीड जिल्ह्याचे दबंग खासदार बजरंग बाप्पा सोनवणे हे आवर्जून उपस्थित राहिले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सौ. रोहिणीताई सुनील देशमुख सरपंच चिंचोली माळी या होत्या. कार्यक्रमाच्या सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करण्यात आले. खा. बजरंग बाप्पा सोनवणे यांच्या हस्ते इमारतीची रिबन कापून उद्घाटनाला सुरुवात झाली. विविध क्षेत्रातील मान्यवरांनी यावेळी आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमासाठी समस्त गावकरी मंडळी, मित्र परिवार, पत्रकार, विविध शिक्षण संस्था चालक, कॉम्प्युटर संस्था चालक, व विविध क्षेत्रातील मान्यवर आवर्जून उपस्थित होते. याचबरोबर ह.भ.प. महाराज शास्त्री संस्थान मठ वारपगाव, पुरुषोत्तम महाराज गिरी, गालफाडे महाराज, गटशिक्षण अधिकारी लक्ष्मण बेडसकर साहेब, मनीषाताई खोपकर जिल्हा अध्यक्षा शिवसंग्राम, शीतल ताई लांडगे, डांगे साहेब, मंजुळदास भिसे, अरविंद थोरात, नितीन सुरवसे, चंद्रकांत पाटील, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ केज तालुका अध्यक्ष, पत्रकार पांडुरंग कसबे, गोविंद शिनगारे, अरुण तात्या काळे, बापू भुसारे, बाप्पाजी चंदनशिव, संघर्ष पत्रकार संघाचे अध्यक्ष रवींद्र मेटे, धीरज गायकवाड, रविराज कापरे, गणेश सत्वधर, पत्रकार सचिन साखरे, पत्रकार सावंत साहेब, इत्यादी यावेळी उपस्थित होते.

# कोमलवाडी ते पंढरपूर पायी दिंडी सोहळ्याचे आयोजन

गेवराई | प्रतिनिधी



बीड जिल्ह्यातील गेवराई तालुक्यातील मौजे कोमलवाडी या ग्रामीण भागात पायी दिंडी सोहळा आयोजित करण्यात आली आहे. या सोहळ्यामध्ये अनेक भक्त सहभागी होतील आणि पंढरपूरला पायी जाऊन विठ्ठलाचे दर्शन घेतील. दिंडी सोहळा म्हणजे वारकरी भक्तांच्या समूहाची धार्मिक मिरवणूक, जी टाळ, मृदंगाच्या गजरात आणि हरिनाम कीर्तनात सहभागी होते, असे मत वारकऱ्यांनी व्यक्त केले.

या पारंपारेचा आजही तेवढीच श्रद्धा निष्ठा आणि भक्ती भवाने वारसा जोपासत नित्यनेमाने आयोजन केले जात आहे तसेच सालाबादप्रमाणे याही वर्षी ह.भ.प. रघुनाथ महाराज निंबाळकर जगदंबा देवी संस्थान भोजगाव यांच्या प्रेरणेने ह.भ.प. विठ्ठल महाराज पंडित यांच्या आशीर्वादाने व ह.भ.प. कानिफनाथ महाराज धापसे यांच्या मार्गदर्शनाखाली माऊली महाराज सोहळा निमित्त भव्य आळंदी ते पंढरपूर श्री संत सम्राट ज्ञानेश्वर महाराज माऊली पायी दिंडी सोहळा कोमलवाडी येथून १९ जून गुरुवार रोजी प्रस्थान दिंडी देवाची आळंदीकडे रवाना होईल यावेळी शेकडो वारकरी महिला पारंपरिक वेशभूषेत सहभागी होणार आहे, अशी माहिती संयोजकांनी दिली आहे.

# पंचायत समिती मध्ये शिवराज्याभिषेक सोहळा मोठ्या उत्साहात साजरा

केज | प्रतिनिधी



केज पंचायत समिती मध्ये मोठ्या उत्साहात शिवराज्याभिषेक सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. प्रथम परिसरात रांगोळी काढण्यात आली. त्यानंतर छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून धुप दिपगुलाल लावुन अभिवांदन करण्यात आले. त्यानंतर भगवा ध्वज फडकवला.

या वेळी उपस्थित गटविकास अधिकारी श्रीमती समृद्धी दिवाणे मॅडम, सहाय्यक गटविकास अधिकारी श्री राठोड साहेब, शेप मॅडम ढोकर साहेब, विस्तार अधिकारी श्री चौरे साहेब, रोडेवार साहेब, मुळे साहेब, मासूमदार साहेब, राऊत साहेब, सरवदे साहेब, शेरेकर साहेब, बनकर मॅडम, राऊत मॅडम, केदार मॅडम, पवार मॅडम इत्यादी सर्व कर्मचारी उपस्थित होते.

# माजलगाव रुग्णालयामध्ये भोंगळ कारभार वरिष्ठ अधिकारी यांचे दुर्लक्ष : मुस्ताक कुरेशी

माजलगाव | प्रतिनिधी

माजलगाव ग्रामीण रुग्णालय मध्ये भोंगळ कारभार सुरू असून वरिष्ठ अधिकारी रुग्णालय मध्ये हजर राहत नाही तसेच औषध सुद्धा बरोबर मिळत नाही रुग्णालय मध्ये अनेक सुविधा उपलब्ध नाही फेन बंद स्वच्छता नसल्याने अनेक मच्छर त्या ठिकाणी पाहण्यास मिळत आहे. डॉक्टर वेळेस उपलब्ध राहत नाही. अनेक दिवस माजलगाव येथे डॉक्टरांची बदली झाली तरी पण काही डॉक्टर माजलगाव ग्रामीण रुग्णालय सोडण्यास तयार नाही तसेच सोय सुविधा पण मिळत नसल्याने रुग्णालयांना अडचणीचा सामना करावा लागत आहे. वरिष्ठ अधिकारी पण उपलब्ध नसल्यामुळे सोय सुविधा मिळत नाही.

माजलगाव ग्रामीण रुग्णालय जर खाजगी असते तर या डॉक्टरांनी त्यामध्ये सोय सुविधा उपलब्ध स्वच्छता आणि एसी बसविली असती परंतु हे सरकारी ग्रामीण रुग्णालय असल्यामुळे यांना काही घेणे देणे नाही. त्यांना वरून प्रशासन पगार वेळे वेळी देतो मग काय गरज आहेत. सोय सुविधा बाबत, कोणी पण यांना विचारणार नाही तुमचं कामाचे कसे चालले असेल तरी कोणी ही बघणार नाही म्हणजे हे सरकारी काम आहे ना अश्या अधिकार मुळे सर्वसामान्य नागरिकांना योग्य वेळी आरोग्य सेवा मिळत नाही व प्रथम उपचार सुद्धा बरोबर केलं जात नाही. तसेच रुग्णालय मध्ये आले का नाही आले तरी चालतील कोणी सुद्धा विचारणार नाही. अश्या अधिकाऱ्यावर जिल्हाधिकारी यांनी योग्य कारवाई करावी, अशी मागणी महाराष्ट्र युवक प्रतिष्ठान जिल्हा अध्यक्ष मुस्ताक कुरेशी यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे ईमेल व्दारे केली आहेत.

## जाणून घ्या, मेंदूचे आजार– डॉ.जगदीश टेकाळे

बीड | प्रतिनिधी

मानवाला सर्व सजीवांपासून वेगळे करणारी गोष्ट म्हणजे मेंदू. शरीराचे संपूर्ण नियंत्रण करण्याचे काम मेंदू करतो. तो मज्जासंस्थेचा एक प्रमुख भाग आहे. सर्व विचार, स्मरणशक्ती, हालचाल आणि वाणी मेंदूद्वारे नियंत्रित होतात. यामध्ये छोटासा बिघाडही धोकादायक ठरू शकते. म्हणूनच मेंदूच्या काही प्रमुख आजारांची व त्यासंबंधीच्या लक्षणांची माहिती असणे आवश्यक आहे.

मेंदूतील गाठी हा मेंदूच्या सामान्य आजारांपैकी एक आहे. त्यामुळे मेंदूच्या नसा दाबल्या जाऊ लागतात आणि त्याची कार्यक्षमता कमी होऊ लागते. याचे सर्वात सामान्य लक्षण म्हणजे वारंवार होणारी आणि दीर्घकाळापासून चालत आलेली सकाळची डोकेदुखी. त्याशिवाय मळमळ–उलट्या, चक्कर येणे, मूड बदलणे इत्यादी लक्षणे सतत जाणवत असल्यास त्याकडे दुर्लक्ष करू नका. याखेरीज ब्रेन स्ट्रोकचे प्रमाणही अलीकडील काळात वाढत आहे. यामध्ये मेंदूच्या पेशी नष्ट होऊ लागतात. परिणामी, शारीरिक नियंत्रणापासून ते विचार करण्याची आणि समजून घेण्याची क्षमता संपुष्टात येऊ लागते. चेहऱ्याच्या किंवा शरीराच्या एका बाजूला अचानक सुन्नपणा जाणवणे हे त्याचे सर्वात मोठे लक्षण आहे. याशिवाय अडचण येऊ शकते. तीव्र डोकेदुखीसह अचानक ताप आल्यास याला मेंदुज्वर असेही म्हणतात.



माजलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती श्रीहरी (नाना) मोरे यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देताना बाजार समितीचे सभापती जयदत्त नरवडे, संचालक प्रभाकरराव होके, मनोज जगताप संजयजी कचरे नंदकिशोर सजगणे, भगवानराव आगे, अमोल जाधव, कादिर पठाण, सचिव हरिभाऊ सवणे, लेखापाल उध्दव फपाळ, आडत उपाध्यक्ष बंडू इके आदी.

## आदर्श शिक्षक श्री.वैभवकुमार घोडके यांना मातृशोक

## पुष्पलता बाबासाहेब घोडके (जिजी) यांचे वृद्धापकाळाने दु:खद निधन

आष्टी | प्रतिनिधी



आष्टी तालुक्यातील सुलेमान देवळा येथील रयत शिक्षण संस्था सेवानिवृत्त शिक्षक श्री.बाबासाहेब घोडके यांच्या पत्नी पुष्पलता घोडके व आदर्श शिक्षक श्री. वैभवकुमार घोडके यांच्या आई या गेल्या काही दिवसांपासून त्या अल्पशा आजाराने रुग्णालयात उपचार घेत होत्या उपचार चालू असताना त्यांचे दु:खत निधन झाले. त्यांच्यावर सुलेमान देवळा येथील अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले त्यांच्या पश्चात पती, एक मुलगी, दोन मुले, दोन सुना अन् नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या निधनाने पंचक्रोशीतुन हळहळ व्यक्त होत आहे.

# सरस्वती फाऊंडेशनच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार आणि विद्यार्थी करियर मार्गदर्शन शिबिर उत्साहात

परतूर | प्रतिनिधी

परतूर येथील सरस्वती फाऊंडेशनच्या वतीने सरस्वती फाऊंडेशन कार्यालय परतूर येथे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार आणि करियर मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रा.मंगेश डावकर यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी सरस्वती फाऊंडेशनच्या अध्यक्षा श्रीमती सुनीता रनबावळे श्रीमती संगीता सूर्यवंशी, श्रीमती विद्या रनबावळे, श्री.गणेश आव्हाड, गजानन सूर्यवंशी, संतोष रनबावळे, आनंद गजभारे, गणेश गजभारे तसेच विद्यार्थी आणि पालक यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या सुरुवातीला विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करून पुष्पहार घालून त्यांचा गौरव करण्यात आला. दरम्यान प्रा.मंगेश डावकर यांनी प्रोजेक्टरच्या माध्यमातून १० वी नंतर पुढे काय.? करियर मार्गदर्शन बाबत मुद्देसूद सादरीकरण करून विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन केले.




**कौशल्य आणि पात्रता तुमच्या भविष्यातील करिअर निवडण्यात महत्त्वाची भूमिका बजावतील : प्रा.डावकर**

तुमच्या करिअरचा तुमच्या भविष्यावर मोठा प्रभाव पडतो.काही शिक्षण पद्धती केवळ ज्ञानावर भर देतात, तर इतर शिक्षण पद्धती कौशल्ये आणि व्यावहारिक शिक्षणावर भर देतात गुणापेक्षा तुमची कौशल्ये आणि क्षमता जास्त महत्त्वाच्या असतात. तुमचे कौशल्य आणि पात्रता तुमच्या भविष्यातील करिअर निवडण्यात महत्त्वाची भूमिका बजावतील. प्रामुख्याने करिअरच्या नवीन वाटा स्वीकारताना विद्यार्थी आणि पालक यांना संभ्रम अवस्था नबळगता भविष्यातील करिअरच्या ठरलेल्या वाटांसोबतच वेगळ्या चाकोरी मोडणाऱ्या नवीन वाटांचा पर्यायाचा शोध विद्यार्थ्यांनी घेतला पाहिजे, असे मत यावेळी प्रा.मंगेश डावकर यांनी व्यक्त केले.

**करियर निवडताना मुलांनी घेतलेले निर्णय पालकांनी मोठ्या मनाने स्वीकारावे...!**

पालकांनी विद्यार्थ्यांची आवड व क्षमता या दोन्ही गोष्टी लक्षात घेऊन करिअरची योग्य निवड करावी, कमी गुणांतील करिअरचे विविध पर्याय कोणते,या विषयांवर पालकांनी विद्यार्थ्यांशी सकारात्मक संवाद साधला पाहिजे. विद्यार्थ्यांनी आवडीच्या आणि योग्यतेच्या क्षेत्रांवर आधारित, ध्येयांशी जुळणारा अभ्यासक्रम निवडायला हवा. प्रामुख्याने करियर निवडताना मुलांनी घेतलेले निर्णय पालकांनी मोठ्या मनाने स्वीकारावे असे मत यावेळी सरस्वती फाऊंडेशनच्या अध्यक्षा श्रीमती सुनीता रनबावळे यांनी व्यक्त केले.

# समाजसेवा ही केवळ शब्दामध्ये व्यक्त करण्याची गोष्ठ नाही : मसु भाऊ जाधव

बीड | प्रतिनिधी



जीवनात आठारा विश्व दारिद्र असताना, परिस्थिती अत्यंत हालाकीची होती, पण परिस्थिती वर मात करत संघर्षाच्या वाटेवरून जिद्दीने प्रगतीचे शिखर गाठली. नाळवंडी सारख्या छोट्या गावातून आपल्या जीवनाचा प्रवास सुरू झाला आणि आज बीड सारख्या शहरात आपली एक अनोखी ओळख निर्माण केली. आंबेडकरी चळवळीची आवड तयार होत असताना इथल्या गरीब, शोषित, पिढीतासाठी लढणे म्हणजे एक युद्ध ला सामोरे जाणे होय, पण अतिशय कमी वयात लागलेली आवड आज सिद्ध होताना दिसत आहे. समाजकारण करत राजकारणात येणे आणि पाठीवर कोणाचाही हात नसताना स्वत:च एक वेगळ अस्तित्व निर्माण करतो या गोष्टीचा एक भाऊ म्हणून मला त्याचा अभिमान वाटतो. सर्वसामान्य जनतेचा आवाज बुलंद करणे, अन्याय आत्याच्यारला वाचा फोडण्याचे काम हा युवा नेता करतोय ही गोष्ठ अभिमानास्पद आहे.असंख्य समस्यांना तोंड देत, आपल्या मधील जबाबदाऱ्या पार पाडणे, अनेक संकटाना सामोरे जाणे या सर्व गोष्टी तर सहन केल्याच. आपल्या जिद्दीचा आणि चिकाटीचा हेवा तर सर्वांना वाटतो, परंतु चांगुलपणाने त्याला होणारा त्रास हा देखील एक भाऊ म्हणून मला जाणवतो.

सर्वसामान्य माणसाला एवढे सगळे काम करत असताना आडचणी येतात परंतु प्रत्येक अडचणीवर मात करून येणाऱ्या काळामध्ये आपल्या हातून गोर गरीब, शोषित, पिढीत अन्यायग्रस्थ, आणि इथल्या सर्वसामान्यांची सेवा घडावी, सर्वांच्या सुख दु:खात सहभागी होऊन इथल्या गरजुवंता साठी कायम तत्पर राहावे अशी मापक अपेक्षा व्यक्त करतो आणि थांबतो, आयूष्यवंत व्हा मसू भाऊ.

# स्टाफ नर्स नियुक्ती घोटाळा प्रकरणी सरकारने संबंधितांवर कठोर कार्यवाही करावी – इंडियन मेडिकल असोसिएशनचे राज्य सहसचिव डॉ.राजेश इंगोले

अंबाजोगाई | प्रतिनिधी

राज्यात सर्वत्र गाजत असलेल्या सरकारी स्टाफ नर्स नियुक्ती प्रकरणी झालेल्या घोटाळ्यासंदर्भात आणि भ्रष्टाचारा संदर्भात राज्य सरकारने त्वरित एसआयटी चौकशी करून संबंधित दोषींवर कडक कार्यवाही करावी अशी मागणी इंडियन मेडिकल असोसिएशनचे राज्य सहसचिव डॉ.राजेश इंगोले यांनी एका निवेदनाद्वारे शासनाला केली आहे.

याप्रकरणी डॉ.इंगोले यांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना सांगितले आहे की, राज्यात अपात्र उमेदवारांना लाच घेऊन अपुरे कागदपत्रे असताना जे पात्र उमेदवार नाहीत. त्यांना वैद्यकीय शिक्षण विभागामार्फत कागदपत्रे पडताळणीसाठी मुंबईला बोलवून त्यांचा अर्थपूर्णरीत्या प्राधान्यक्रम भरून घेतलेला आहे व पात्र उमेदवारांना कसलीही कल्पना न देता अवैधरित्या या अपात्र उमेदवारांच्या नियुक्त्या केल्या गेलेल्या आहेत. या नियुक्त्यांचा दर जवळपास २० ते ३० लाख रूपये ठरलेला आहे व अनेक अपात्र उमेदवारांनी ही रक्कम संबंधित आरोपींना दिलेली आहे. अपात्र असलेल्या उमेदवारांच्या कागदपत्रांची पडताळणी करून त्याला मान्यता देण्यासाठी डीएमईआर ऑफिसच्या बाजूला असलेल्या पडताळणी कार्यालयाने सहा लाखांची रक्कम घेतलेली आहे असे अनेक उमेदवारांनी नांव न सांगण्याच्या अटीवर सांगितले आहे. त्यामुळे हा भ्रष्टाचार कोट्यावधी रूपयांचा असल्याची शंका आहे. ही प्रक्रिया पात्र उमेदवारांवर अन्यायकारक आहे व त्यांच्यावर अन्याय करणारी आहे. त्यामुळे या सबंध भरती प्रक्रियेविषयी प्रश्नचिन्ह निर्माण झालेले आहे. त्यामुळे शासनाने या प्रकरणी तात्काळ लक्ष घालून स्टाफ नर्स नियुक्ती घोटाळा प्रकरणी एसआयटी चौकशी करून संबंधित गुन्हेगारांवर कडक कायदेशीर कार्यवाही करून भविष्यामध्ये असे प्रकार घडू नयेत यासाठी काळजी घ्यावी अशी मागणी अंबाजोगाई नगरपरिषदेचे माजी शिक्षण सभापती तथा इंडियन मेडिकल असोसिएशनचे राज्य सहसचिव डॉ.राजेश इंगोले यांनी एका निवेदनाद्वारे सरकारला केली आहे.

याप्रकरणी शासनाने पारदर्शक पद्धतीने कार्यवाही न केल्यास अन्यायग्रस्त, पात्र डावललेल्या उमेदवारांच्या वतीने संघर्ष समिती स्थापन करून राज्यभरात तीव्र आंदोलन करण्यात येईल असेही डॉ.राजेश इंगोले यांनी शासनाला कळविले आहे.

## ना.अजितदादांनी सोडविला फास; बिंदुसरा नदीने घेतला मोकळा श्वास

# तब्बल २५ वर्षांनंतर बिंदुसरा नदी स्वच्छ झाली

## आ.संदीप क्षीरसागरांनी मानले ना.अजितदादांचे आभार

बीड । प्रतिनिधी



बीड शहराची जलधारा असलेली बिंदुसरा नदीला आवळला गेलेला अस्वच्छतेचा फास ना.अजितदादांनी सोडविला आणि तब्बल २५ वर्षांनंतर बिंदुसरा नदीने मोकळा श्वास घेतला. ना.अजितदादांनी तातडीने बिंदुसरा नदी स्वच्छतेच्या कामासाठी तातडीने यंत्रणा उभी करून दिली. त्यामुळेच बिंदुसरा नदीची स्वच्छता करणे शक्य झाले आहे. बिंदुसरा नदीची स्वच्छता झाल्यामुळे बीड शहरात पुराचा धोका कमी झाला आहे. सोबतच बीड शहरात पाणी साठवणूक करण्यासाठीही व्यवस्था झाली आहे. त्याबद्दल बीड शहरवीसीयांच्या वतीने आ.संदीप क्षीरसागर यांनी ना.अजितदादा पवार यांचे आभार मानले आहेत.

बीड शहरातून बिंदुसरा नदी वाहते. परंतु गेल्या २५ वर्षांपासून या नदीच्या संवर्धनासाठी कसल्याही प्रकारचे काम झाले नव्हते त्यामुळे बीड शहर आणि तालुक्याची जलधारा असलेली बिंदुसरा नदीची अतिशय वाईट अवस्था झाली होती. बीड शहरात पावसाळ्याच्या काळात पुराचा धोका टाळण्यासाठी नदीची स्वच्छता होणे अत्यंत गरजेचे होते. ही बाब लक्षात घेऊन आ.संदीप क्षीरसागर यांच्या मागणीनुसार बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना.अजित दादा पवार यांनी तातडीने यंत्रणा उभी करून दिली. विशेष म्हणजे या महत्वाच्या कामासाठी कसलीही निविदा प्रक्रिया वगैरे वेळ लागणार्या प्रक्रियेतून न जाता आपल्या स्तरावरूनच ना.अजित दादांनी यंत्रणा कामाला लावली.




ना.अजितदादांच्या निर्देशावरून २० मे २०२५ रोजी मा. जिल्हाधिकार्यांच्या मार्गदर्शनाखाली महसूल प्रशासन, बीड नगरपालिका प्रशासन आदी कामाला लागले आणि बिंदुसरा नदीची स्वच्छता मोहीम सुरू झाली. गेल्या १७ दिवसांमध्ये अखंडितपणे नदीची स्वच्छता करण्याचे काम सुरू होते.

शेवटी ना.अजित दादांमुळेच हे शक्य झाले. ना.दादांच्या सूचनेवरून शासकीय विभाग, विविध सामाजिक संस्था आणि प्रशासकीय यंत्रणा यांनी जोमाने काम करत बिंदुसरा नदीला अस्वच्छतेच्या विळख्यातून बाहेर काढले. बिंदुसरा नदीची स्वच्छता झाल्यामुळे गेल्या आठवड्यात पूरपरिस्थीती निर्माण होण्यासारखी अतिवृष्टी झाल्यानंतरही बीड शहराला पूराचा धोका झाला नाही. सोबतच बिंदुसरा धारणाच्या मोठ्या चादरीवरून पाणी वाहीले तरीही बीड शहरात कुठेही पाणी शिरले नाही. ही अतिशय मोठी आणि समाधानकारक बाब आहे. यापुढील काळातही बीब शहराला बिंदुसरा नदीच्या स्वच्छतेमुळे पुराचा धोका अतिशय कमी झाला आहे. याबद्दल ना.अजिदादांचे बीडकर कायम ऋणी असतील अशी भावना आ.संदीप क्षीरसागर यांनी व्यक्त केली.

### जिल्हाधिकारी आणि सर्वच सहभागी यंत्रणांचेही आभार– आ.संदीप क्षीरसागर



दि.२० मे रोजी बिंदुसरा नदी स्वच्छता आणि खोलीकरण कामाचे उद्घाटन करण्यात आले. त्यानंतर सलग आजपर्यंत १७ दिवसांच्या स्वच्छता मोहीमेत जिल्हाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक यंत्रणांनी सहभाग नोंदवला. नगरपालिका प्रशासन, महसूल प्रशासन, जायकवाडी पाटबंधारे विभाग यांच्यासह भारतीय जैन संघटना, जलसंपदा विभाग, नाम फाउंडेशन यांनीही स्वेच्छेने सहभाग घेतला होता. सर्वांच्या सहकार्यामुळेच बिंदुसरा नदीचे स्वच्छताकाम पूर्णत्वास जाऊ शकले. याबद्दल जिल्हाधिकारी आणि बिंदुसरा नदीच्या स्वच्छता मोहीमेत सहभागी झालेल्या सर्व यंत्रणांचे आ.संदीप क्षीरसागर यांनी आभार व्यक्त केले आहेत.

## कडा पोलिसांच्या नाकावर टिच्चून शहरात चोऱ्या!

### केरूळ चौकात पान टपरी; आंबेडकर चौकात दोन दुकाने फोडले

कडा । प्रतिनिधी




दौलावडगाव कडा येथील आंबेडकर चौकातील जय मल्हार मशिनरी आणि अशोक पशुखाद्य तर केरूळ चौकातील गणेश पान सेंटर या तीनही ठिकाणी एकाच दिवशी दुकानफोडी करून चोरट्यांनी लाखाच्या जवळपास ऐवज लंपास केला. सदर घटना शुक्रवारी मध्यरात्री कडा – धामणगाव रस्त्यालगत घडली. शहरात कडा पोलिसांच्या नाकावर टिच्चून चोरीच्या घटना घडू लागल्याचे दिसून येत आहे.

आष्टी तालुक्यातील कडा येथील डॉ. आंबेडकर चौक ते केरुळ चौक, कडा–धामणगाव रस्त्यालगत चोरट्यांनी दुकानावर डल्ला मारून शुक्रवारी मध्यरात्रीच्या सुमारास धुडगूस घालून दोन दुकानांसह एक पानाची टपरी फोडून लाखभर रुपयांच्या ऐवज लुटून पोबारा केला. कडा येथील आंबेडकर चौकातील धामणगाव रोडलगत असलेले मल्हारी पाचपुते यांचे, जय मल्हार मशिनरी व अशोक हजारे, यांचे अशोक पशुखाद्य ही दोनही दुकाने चोरट्यांनी मागच्या बाजूने फोडली. पाचपुते यांच्या मागच्या लोखंडी शटरचे कुलूप पट्टी तोडून चोरट्यांनी दुकानात प्रवेश केला. तसेच सीसीटीव्ही कॅमेऱ्याची वायर काढून दुकानातील पंचावन हजाराची कॉपर वायर, आठ ते दहा हजाराचे पितळी नेपल आणि गल्ल्यातील पस्तीस हजाराची रोख रक्कम लांबवली. तर अशोक हजारे यांचे पशुखाद्य दुकान त्याच पद्धतीने फोडून त्यांच्याही गल्ल्यातील तीन–साडेतीन हजाराची रोकड व अडीचशे तीनशे रुपयांची चिल्लर चोरट्यांनी गायब केली. त्यांच्याच शेजारच्या नाझिया कलेक्शनच्या छताच्या पत्र्याचे हुक काढण्याचा प्रयत्न केला. दुसरीकडे त्याच दिवशी केरूळ चौकातील संपत परदेशी यांची पानाची टपरी फोडून चोरट्यांनी दहा हजाराच्या सिगारेट पाकिटांसह नगदी साडेआठ हजार लांबिवले. घटनास्थळी पोलिस उपनिरीक्षक आजिनाथ काकडे यांनी भेट दिली. एकाच रात्री अनेक ठिकाणी दुकानफोडी झाल्यामुळे नागरिक भयभीत झाले असून पोलिसांनी चोरांचा बंदोबस्त करावा, अशी मागणी होत आहे.

## रोहन गलांडे यांचे विविध मागण्यांवर अमरण उपोषण सुरू

### मी उपोषणाला बसणार म्हणून माझी बदनामी : रोहन गलांडे

केज । प्रतिनिधी



केज पुण्यभूमी चिंचोली माळी येथील नागबेट वस्ती ते श्री संत नामदेव महाराज तीर्थक्षेत्रातील अतिक्रमण हटविण्यात यावे म्हणून रोहन गलांडे पाटील यांचे अमरण उपोषणाला बसणार २७ मे रोजी बसणार होतो म्हणून अतिक्रमण धारकांनी मला चहाच्या हॉटेल मध्ये घेऊन जाऊन नशाहीन पदार्थ मला चहा मध्ये दीला व नंतर मला स्वातंत्र्य सैनिकांच्या समाधीवर घेऊन जाऊन मला मध्ये प्राशन करण्यासाठी मजबुर केले नशाहीन पदार्थ पोटात गेल्यामुळे मला काही कळत नव्हते व नंतर मला मध्ये प्राशन करायला लाऊन माझे विडीओ काढुन सोशल मीडियावर व्हायरल केले नंतर मला मारहाण केली कारण मी अमरण उपोषणाला २७ मे रोजी बसणार आहे म्हणून याला आगोदरच जिव मारु असा मोठा कट या प्रकरणात शिजत होता व अतिक्रमण धारकांनी रचला होता व विडीओ काढणाऱ्याचे व मार हान करणावर सोशल नेटवर्कर बदनामी करणाऱ्यांन मानहानी व सायबर क्राईम मार्फत गुन्हा दाखल करण्यात यावे वर प्रशासनाने कारवाई करण्यात यावी असे रोहन गलांडे पाटील यांनी म्हटले आहे.

रोहन गलांडे मराठा असल्याचा राग मनात धरून अतिक्रमण धारकांनी बदनामी सोशल मीडियावर केली आहे परंतु नंतर रोहन गलांडे यांनी ७ जुन रोजी अमरण उपोषणाला बसले आहेत तरी अतिक्रमण हटविण्यात येत नाही तोपर्यंत उपोषण सोडणार नाही मग मेलो तरी हरकत नाही असे रोहन गलांडे पाटील यांनी म्हटले आहे तसेच पुढील मागण्या महाराष्ट्रातील शेतकरी कर्जमाफी, बँक खात्यावरील होल्ड काढणे, पिकांना हमीभावासाठी कायदा, व आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबियांना तात्काळ आर्थिक मदत याबाबत चिंचोली माळी बाजार स्थळ व प्राथमिक आरोग्य केंद्र अतिक्रमण. श्री संत नामदेव महाराज तीर्थक्षेत्र परीसरातील सर्व अतिक्रमण हटवा. चिंचोली माळी ते हादगाव रोडचे काम तात्काळ सुरु करा. मान्सुनपुर्व पाऊस झाल्यामुळे नुकसानीचे पंचनामे करणे पंचनामे करण्यात यावे. पाणंद रस्ता ५१,५२,५३, ची कॉलीटी कंट्रोल मार्फत चौकशी करा या मागण्या मान्य करण्यात येत नाहीत तोपर्यंत अमरण उपोषन सोडणार नाही असे रोहन गलांडे पाटील यांनी म्हटले आहे.

## सर्व शेतकऱ्यांनी फार्मर आयडी काढून घ्यावेत नसता शासकीय लाभ मिळणार नाही

आष्टी । प्रतिनिधी

सर्व शेतकऱ्यांनी फार्मर आयडी काढणे गरजेचे आहे पंधरा एप्रिल च्या शासन नियमानुसार अवकाळी पावसामुळे झालेली नुकसानी करता तसेच इतर शासकीय अनुदानित कृषी संबंधी योजना पीएम किसान या व इतर सर्व कृषी संबंधी योजनेसाठी फार्मर आयडी बंधनकारक असणार आहे. ज्या शेतकऱ्यांनी फॉर्मर आयडी काढली नाहीत अशा शेतकऱ्यांना आपले फॉर्मवर आयडी त्वरित काढून घ्यावेत एखाद्या शेतकऱ्यांचे फार्मर आणि काढली नसल्यास तो अनुदानापासून अथवा सर्व शासकीय योजना पासून वंचित राहिले तर त्याचे सर्व जबाबदारी शेतकऱ्याची असेल असे मत घाटा पिंपरी ग्रामपंचायत येथे आयोजित केलेल्या फार्मर आयडी कार्यक्रमात तलाठी अकोलकर यांनी आपले मत व्यक्त केले. यावेळी सरपंच प्रल्हाद मुळीक, निलेश झांजे, विलास शिरसाट, पत्रकार सुरेश कांबळे, माजी उपसरपंच छगन तळेकर सह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी सर्वांना फार्मर आयडी विषयावर सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

## कोणत्याही आपत्तीसाठी तयार रहा : निवासी उपजिल्हाधिकारी स्वामी

### आपदा मित्र प्रशिक्षणाला उत्स्फूर्त प्रतिसाद ; सुमारे १५० उमेदवारांचा सहभाग

बीड । प्रतिनिधी



जिल्हा क्रीडा संकुल, बीड येथे सहा जूनपासून सुरु झालेल्या १२ दिवसीय आपदा मित्र प्रशिक्षण कार्यक्रमास उमेदवारांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. पहिल्याच दिवशी सुमारे १५० प्रशिक्षणार्थींनी यात सहभाग नोंदवला. बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी या प्रशिक्षणात बीड मधील नागरिक, महाविद्यालयीन विद्यार्थी, एनसीसी उमेदवार, सामाजिक संस्था, शासकीय / निमशासकिय कर्मचाऱ्यांनी सहभाग नोंदवावा असे आवाहन केले आहे.

सात जून शनिवार रोजी बीडचे निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी या प्रशिक्षण ठिकाणी भेट दिली. यावेळी त्यांनी प्रशिक्षणार्थी यांच्याशी संवाद साधला. यावेळी बोलताना निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी म्हटले की नैसर्गिक आपत्ती येऊच नये अशी आपली इच्छा असते. तथापि आपत्ती ही अचानक येत असते. यावेळी आपण सर्वांनी तयार असले पाहिजे. तहसीलदार शेळके यांनी आपल्या भाषणात म्हटले की नैसर्गिक आपत्ती बाबतचे प्रशिक्षण सर्वांनी गांभीर्याने घ्यावे. २००४ सालची हिंदी महासागरातील त्सुनामी सर्वांच्या स्मरणात असेलच. दक्षिण भारत, अंदमान निकोबार बेटे, लक्षद्वीप बेटे, इंडोनेशिया इत्यादी भागात मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. २००१ सालचा गुजरात मधील भूकंप ज्यात जवळपास चार लाख लोक बेघर झाले होते, १९९९ सालचा ओडिशा मधील सुपर सायक्लोन, मुंबईतील अतिवृष्टी या प्रमुख आपत्ती आपण अनुभवल्या आहेत, त्यामुळे संभाव्य आपत्तींचा सामना करण्यासाठी आपण सज्ज राहायला हवे, असेही आवाहन त्यांनी केले.

विशेष म्हणजे, प्रशिक्षणामध्ये महिलांचाही लक्षणीय सहभाग दिसून येत असून आपत्ती व्यवस्थापनासारख्या क्षेत्रात महिला देखील सक्रियपणे पुढे येत आहेत, ही बाब विशेष उल्लेखनीय आहे. हा प्रशिक्षण उपक्रम राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण (एस डी एम ए) यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला असून जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण व जिल्हा क्रिडा विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने याचे आयोजन करण्यात आले आहे.

प्रशिक्षणात उमेदवारांना आपत्तीच्या वेळी तात्काळ मदत, बचाव कार्य, प्राथमिक उपचार, स्ट्रेचर वापर, दोरखंडाची मदत, तसेच पूर, भूकंप, वीज पडणे यासारख्या नैसर्गिक आपत्तींमधून नागरिकांचे प्राण वाचविण्यासाठीचे प्रशिक्षण दिले जात आहे. व्यावसायिक प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली हे प्रशिक्षण दिले जात आहे. महिला प्रशिक्षणार्थींनी यामध्ये विशेष आवडीने सहभाग घेतल्याने 'आपदा मित्र' ही मोहीम सर्वसमावेशक आणि समतोल दिशेने वाटचाल करत असल्याचे चित्र दिसून आले आहे. महिलांचे सहभागाचे प्रमाण वाढल्याने आपत्ती काळात स्थानिक स्तरावर महिलांच्या माध्यमातूनही प्रभावी मदत मिळू शकणार आहे.

प्रशिक्षणाच्या प्रारंभी प्रशिक्षकांनी प्रशिक्षणाच्या गरजेवर भर देत उपस्थितांमध्ये आपत्ती काळात स्वयंसेवेच्या माध्यमातून समाजाची सेवा करण्याचा संदेश दिला. हा उपक्रम पुढील १२ दिवस सुरू राहणार असून दररोज विविध प्रात्यक्षिके व सैद्धांतिक सत्राद्वारे प्रशिक्षण दिले जाणार आहे. प्रशिक्षणानंतर पात्र उमेदवारांना आपत्ती व्यवस्थापन किट व प्रशस्तीपत्रक देण्यात येणार असून त्यांची नोंद 'आपदा मित्र' म्हणून जिल्हास्तरावर करण्यात येणार आहे. या प्रशिक्षणामध्ये बीड मधील नागरिक, महाविद्यालयीन विद्यार्थी, एनसीसी उमेदवार, सामाजिक संस्था, आशा / अंगणवाडी सेविका, होमगार्ड, पोलिस, खाजगी सुरक्षा रक्षक, शासकीय / निमशासकिय कर्मचाऱ्यांनी सहभाग नोंदवावा असे आवाहन करण्यात येत आहे.

## घातक हत्याराने जिवे मारण्याच्या उद्देशाने मारहाण प्रकरण; तीन आरोपींचा जमीन फेटाळला : ॲड गणेश तावरे

बीड । प्रतिनिधी

घातक हत्याराने जिवे मारण्याच्या उद्देशाने मारहाण प्रकरण घटना अशी की फिर्यादी कृष्णा माणिक बर्डे, रा. धामणगांव ता.आष्टी जि. बीड दिनांक १४/०५/२०२५ रोजी धामनगांव येथे पाऊस आल्याने मी ०८ वाजेच्या सुमारास सायंकाळी सुनिल नवनाथ बर्डे यांचे घरी असतांना आरोपी १) रामा बबन गायकवाड, २) महादेव विठ्ठल बर्डे, ३) बाबु बबन गायकवाड, ४) ब्रम्हा विठ्ठल बर्डे, ५) सुभाष रायभान बर्डे, ६) विष्णू बर्डे हे सर्वजण सुनिलच्या घरी आले जुन्या भांडणाचे कारण काढून सुनिल नवनाथ बर्डे यांना म्हणाले की, तु घराबाहेर चल असं म्हणताच सुनिल बर्डेला घराचे बाहेर ओढले व त्याला मुंडक्याला धरून रामा बबन गायकवाड याने खाली पाडले तेवढ्यात तेथे लगेच ब्रम्हा विठ्ठल बर्डे त्याच्या हातातील धारधार चाकूने सुनिल च्या डाव्या बाजुला पोटात मारून गंभीर जखमी केले व तेथे सुनिले हा बेशुध्द पडला. त्यानंतर कृष्णा बर्डे याला विष्णू विठ्ठल बर्डे, याने त्याचे हातातील धारधार तलवारीने कृष्णाच्या उजव्या गालावर मारून जखमी केले.



तसेच महादेव विठ्ठल बर्डे याने व त्यांचे सोबत असलेले बाबु बबन गायकवाड, रामा बबन गायकवाड यादोघांनी कृष्णा व सुनिल बर्डे ला खाली पाडून शस्त्राचा धाक दाखवून लाथा बुक्कयाने व चापटाने मारहाण केली. यावर आमचे भांडण चालु असताना तेथे अचानक सुभाष बर्डे, विष्णू बर्डे यांनी त्यांचे हातात लाकडी दांडे घेवून त्या दोघांनी कृष्णाला व सुनिल बर्डे ला पाठीत व कंबरावर मारहाण केली.

वरील आरोपी क्र. १ ते ६ यांनी कृष्णा बर्डे व सुनील बर्डेला शिवीगाळ करून तलवार, चाकू, लाकडी दांडेने जिवे मारण्याच्या उद्देशाने केलेल्या मारहाण प्रकरनी अंभोरा पोलिस स्टेशन ता.आष्टी जि. बीड भारतीय शस्त्रास्त्र कायद्याच्या कलम ४,२५ व भारतीय न्यायाच्या कलम ११८(२), ११८ (१), १८९ (२), १९०, १९१ (३), ११५ (२), ३५२ आणि ३५१ (२) इछड कलमा अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला सदर ६ आरोपी पैकी महादेव विठ्ठल बर्डे,ब्रह्मा ब्रह्मदेव विठ्ठल बर्डे, विष्णू विठ्ठल बर्डे यांनी मा. जिल्हा व सत्र न्यायालय, बीड येथे अटकपूर्व जामीन मिळण्यासाठी अर्ज केलेला होता. सदरील अर्जावर सुनावणी होवून सरकारी वकील नितीन राख व फिर्यादीचे वकील ड गणेश तावरे यांचा युक्तीवाद ग्राह्य धरून ३ ही आरोपींचा मा. न्यायालयाने अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळला नामंजूर केला फिर्यादी तर्फे ॲड. गणेश हनुमंत तावरे यांनी काम पाहिले.

## चाकरवाडी शिवभक्तांनी गजबजली, लाखों भाविक दाखल

### आजपासून प्रदिप मिश्राजींच्या शिवमहापुराण कथेस प्रारंभ

चाकरवाडी । प्रतिनिधी




विसाव्या शतकातील महान संत सद्गुरू संत श्री ज्ञानेश्वर माऊली दादा महाराज यांच्या पंचेविसाव्या पुण्यस्मरणार्थ रौप्यमहोत्सवी सोहळ्यास तपोनिधी शांतीब्रह गुरुवर्य महादेव महाराज तात्या श्री क्षेत्र चाकरवाडी यांच्या मार्गदर्शनाखाली अखंड हरिनाम सप्ताहाची सुरवात श्री माऊली दादाच्या समाधी पूजन, अभिषेकने शनिवारी सुरुवात करण्यात आली. यानंतर भव्य ग्रंथ दिंडीची विविध वाद्य सह मिरवणूक काढण्यात आली असून मराठवाड्यातील सर्वात मोठ्या प्रदीप मिश्राजी सिहोर वाले यांच्या शिवपुराण कथेची आज पासून सुरुवात होणार आहे.

अखंड हरिनाम सप्ताहाच्या निमित्ताने मुख्य कार्यक्रम व्यासपीठ पूजन करण्यात आले. यात मंगल कलश स्थापना, दीप प्रज्वलन, टाळ, मृदुंग, वीण, श्रुती पूजन, ध्वजारोहण, मुख्य संत महंतांच्या तपोनिधी शांतीब्रह गुरुवर्य महादेव महाराज यांच्या हस्ते करण्यात आले. नारायण महाराज भाऊ, शांतीब्रम्ह गुरुवर्य नवनाथ बाबा महाराज, श्री क्षेत्र गोरखनाथ टेकडी, लक्ष्मण महाराज मेंगडे श्री बंकटस्वामी मठ संस्थान श्री क्षेत्र नेकनुर, रामकृष्ण रंघवे बापू, उद्धव बापू आपेगावकर, पंडित महाराज गिरी, विश्वनाथ अप्पा स्वामी कपिलधर, डॉ.प्रशांत स्वामी ज्ञानेबा माऊली महाराज श्री क्षेत्र बरड, नाना महाराज कदम, सुरेश महाराज जाधव, दत्तात्रय मिसळ महाराज यांच्या हस्ते मुख्य व्यासपीठ पूजन करून अखंड हरिनाम सप्ताह सुरूवात करण्यात आली, यानंतर ज्ञानेश्वरी पारायण रमाबुवा महाराज काजळे यांच्या नेतृत्वाखाली घेण्यात आले.

गाथा भजन ओंकार महाराज जगताप, संजय देवकर, मनोहर मुंडे, भारतबुवा पठाडे, कंठभूषण श्री अभिमन्यु ढाकणे यांच्या नेतृत्वाखाली घेण्यात आले. अतिशय उत्सवात माऊली दादाच्या समाधी पूजन, ग्रंथ दिंडी, व्यासपीठ पूजन, संत ज्ञानेश्वरी पारायण, गाथा भजन, या कार्यक्रमाने आज तपोनिधी शांतीब्रह गुरुवर्य महादेव महाराज चाकरवाडीकर यांच्या मार्गदर्शन करण्यात आले.

## तुळजापूर, अक्कलकोट मंदिरात ना.पंकजा मुंडे यांचे 'नो प्लास्टीक' अभियान

### मंदिर परिसरातील प्लास्टीक कचरा स्वतः उचलून नागरिकांना दिला संदेश एकल प्लास्टीकचा पुनर्वापर टाळा – भाविक भक्तांना केले आवाहन

सोलापूर । प्रतिनिधी

राज्याच्या पर्यावरण व वातारणीय बदल मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी आज श्रीक्षेत्र तुळजापूर व अक्कलकोट मंदिरात आज 'नो प्लास्टीक' अभियान यशस्वीपणे राबवले मंदिर परिसरातील प्लास्टीकचा कचरा स्वत: उचलून त्यांनी नागरिकांना प्लास्टीकमुक्तीचा संदेश दिला. एकल प्लास्टीकचा पुनर्वापर रोखण्याचे आवाहनही त्यानी यावेळी केले.

ना. पंकजाताई मुंडे आज श्रीक्षेत्र तुळजापूर, अक्कलकोट व गाणगापूर च्या दौर्यावर होत्या. दुपारी तुळजापूर येथे पोचल्यावर त्यांनी तुळजाभवानी मातेची खण नारळाने ओटी भरून दर्शन घेतले. भाजपचे जिल्हाध्यक्ष दत्ता कुलकर्णी, पर्यावरण व प्रदुषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी, मंदिर समितीचे विश्वस्त यावेळी उपस्थित होते.




**प्लास्टीकचा कचरा उचलला ; कापडी पिशव्या वाटप केल्या**

देवीचे दर्शन झाल्यानंतर ना. पंकजाताई मुंडे यांनी परिसरातील प्लास्टीकचा कचरा स्वत: उचलला, त्यांच्या या कृतीने उपस्थित भाविकांनी देखील पुढे येवून योगदान दिले. मंदिराच्या बाहेर असलेल्या दुकानांना भेटी देऊन त्यांना प्लास्टीक पिशव्यांचा वापर न करण्याचे आवाहन केले याशिवाय उपस्थित भाविकांना तसेच दुकानदारांना त्यांनी कापडी पिशव्यांचे वाटप केले. मंदिर समितीच्या वतीने कार्यालयात त्यांचा याप्रसंगी हृद्य सत्कार करण्यात आला.

**एकल प्लास्टीकचा वापर टाळा**

ना. पंकजाताईंनी अक्कलकोट येथे श्री स्वामी समर्थ व गाणगापूर येथे श्री दत्तात्रयांचे दर्शन घेतले. याठिकाणी भाविकांना मार्गदर्शन करताना त्यांनी एकल प्लास्टीकचा पुनर्वापर रोखण्याचे आवाहन केले. प्लास्टीकची समस्या सध्या गंभीर बनली आहे, प्लास्टीक पिशव्या हया पर्यावरणाला अतिशय घातक आहेत, त्याचा वापर करू नये. प्लास्टीक ऐवजी कापडी पिशव्यांचा वापर करावा असं आवाहन त्यांनी केलं. आमदार सचिन कल्याणशेट्टी, अक्कलकोट मंदिर संस्थानचे अध्यक्ष महेश इंगळे यावेळी उपस्थित होते.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड–४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१–७–३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड–४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक – दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT